जा.क्र. म.सं.कें/प्रअरू./बाटा/ १६६ /२०२३
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली.
दि. 02/04/2023

प्रति,

______________________

______________________

______________________

**विषय** ः आंबा बाटा खरेदीचे पुरवठयाचे दरपत्रक पुरविण्याबाबत...

महोदय,

वरील विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत असलेल्या रूखी या विभागास खाली नमूद केल्यानुसार आंबा बाटा खरेदी करावयाचा आहे. तरी या बाबतचे आपले मोहोरबंद लखोटयातील दरपत्रक पोस्टाव्दारे किंवा हातबटवडयाने या कार्यालयास पाठविणेत यावे. आवश्यक आंबा बाटा पुरवठयाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ क्र | तपशिल | आवश्यक अंदाजे प्रमाण किलो |
|---|---|---|
| १. | कॅनिंगचा (साल विरहीत) स्वच्छ धुतलेला आंबा बाटा | ६ टन |
| | किंवा | |
| २. | कॅनिंगचा (साल मिश्रीत) स्वच्छ धुतलेला आंबा बाटा | १० टन |

अटी व शर्ती

बंद लखोटयातील दरपत्रके दि.१७.०५.२०२३ पर्यंत मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली कार्यालयात पोहोच होणे आवश्यक आहेत. तदनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. बंद लखोटयावर आंबा बाटा खरेदीसाठीचे पुरवठयाचे दरपत्रक असा उल्लेख करणे आवश्यक आहे.

विहीत मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि.१८.०५.२०२३ रोजी या कार्यालयात उघडण्यात येतील

१. टपाल खात्याचे विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही.

२. दरपत्रकामध्ये पूरवठादाराने GST क. नमुद करणे आवश्यक आहे.

३. GST क. लागु नसल्यास तत्सम प्रधिकरणाकडील नोंदणी क. असलेले पूरवठादाराचे लेटर हेडवरील दरपत्रक आवश्यक, सोबत PAN Card जोडणे अनिवार्य आहे.

४. अधिकृत विकेते अथवा उत्पादक असल्यास तसे प्रमाणपत्र जोडावे तसेच संबंधित कंपनीची अधिकृत दर सूची जोडावी.

५. दरपत्रकांमध्ये सर्व करांचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

६. साहित्य या केंद्राच्या प्रक्षेत्रावर पोहोच करणे बंधनकारक आहे.

७. कार्यालय कोणतेही कारण न देता आपल्या स्वच्छेधिकारावर हे दरपत्रक रद्द करण्याचा मागे घेण्याचा दुरूस्ती करण्याचा किंवा नियत तारीख वाढवण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.

८. दरपत्रकांमध्ये प्रोप्रायटर चे नाव नमुद होणे व PAN Card जोडणे आवश्यक आहे.

९. एक अथवा सर्व दरपत्रके फेटाळण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार त्यांचेकडे राखून ठेवीत आहेत.

१०. स्वच्छ धुतलेल्या साल विरहीत आंबा बाटयाचे दर हे माहे जुन २०२३ पर्यंत बंधनकारक राहतील.

११. काळा पडलेला खराब बाटा तसेच लांबट आकाराचा तोतापुरी जातीसारखा आंबा बाटा स्विकारण्यात येणार नाही.

आपला विश्वासु,

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,
ता. दापोली, जि. रत्नागिरी

जा.क.मसके/प्रअरू./बाटा/९६६/२०२३
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
दिनांक : 02/04/2023

प्रती,

**मा. व्यवस्थापक,**
कृषिज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

**विषय** : रूखी विभागाअंतर्गत आंबा बाटा खरेदीचे जाहिरातीस विद्यापीठ संकेतस्थळावर (www.dbskkv.org) प्रसिध्दी देणे बाबत............

महाशय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, या केंद्रास रूखी विभागाकरीता आंबा बाटा खरेदी करावयाचा आहे. त्याबाबतची प्रसिध्दी विद्यापीठ संकेतस्थळावर (www.dbskkv.org) करणेस विनंती आहे. सोवत प्रसिध्दी नमुना जोडणेत येत आहे.

सोबत : वरील प्रमाणे.

आपला विश्वासू,

**संचालक,**
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली,
ता. दापोली जि. रत्नागिरी